# आनंदी जीवन आणि मानव कल्याण :
# कृतिगाथा या ग्रंथात प्रकाशित झालेल्या लेख...

## लोकसंस्कृतीतून समाजप्रबोधन : लोकरंजनातून लोकशिक्षण

**महाराष्ट्रातील संत, कवी, शाहीर, वाघ्या मुरळी अशा विविध लोककलावंतांनी गण, गवळण, पोवाडे, लावण्या, वग, अभंग, ओवी, शाहिरी फटका तमाशा, लोकनाट्य, वासुदेव, भारुड इत्यादी लोककला प्रकारांच्या माध्यमातून...**

**i) माणसाच्या च्या मनात सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.**

**ii) समाजातील विविध प्रश्नांवर भाष्य व काव्य केलेले आहे.**

**iii) काव्य, नृत्य, संगीत, च्या माध्यमातून समाजप्रबोधन केलेलं आहे.**

**iv) समाजातील आणि मुख्यतः मानवी जीवन व्यवहारातील कुप्रवृत्तीवर नकारात्मकतेवर विध्वंसकतेबद्दल परस्पर वाटोळंवर्धक वर्तनाबद्दल व्यसनाधीनतेविषयी अंधश्रद्धा व कर्मकांडी वृत्तीबद्दल.**

**a) कान उघडणी केली आहे.**

**b) परखडपणे टिका केलेली आहे.**

**c) सुसंस्कार व कर्मयोगी वृत्तीबद्दल मार्गदर्शन केले आहे.**

**d) धर्माबद्दल द्वेष न पसरवता भक्तीमार्गाची व्याप्ती सांगून सर्वांसाठी भक्तीचा मार्ग मोकळा केला.**

**e) स्वधर्म जपून समाजासाठी जगणे शिकवले.**

**v) आपल्या समाजव्यवस्थेत जर काही बदल घडवायचा असेल, तसेच मानवी स्वभावात परीवर्तन करायचे असेल तर तो बदल ते परीवर्तन व्यवस्थेच्या बाहेर जाऊन त्याची हेटाळणी करून चालणार नाही हे स्पष्ट केले.**

**विविध लोककला :-**

**1. नमन : चौदा विद्या आणि चौसष्ट कलेचा अधिपती गणराज गणपतीला नृत्याच्या माध्यमातून नमस्कार केला जातो.**

**2. वासुदेव :- डोक्यावरती मोरपिसांचा टोप, अंगरख्याचा घोळ, हातात टाळ - चिपळ्या, मुखात परमेश्वराचे नामस्मरण करत पहाटेच्या वेळी वासुदेवाची स्वारी दान मागत समाजाला प्रबोधन करायची.**

**3. गवळण :- स्वधर्म जपून समाजासाठी जगणं किती महत्त्वाचं आहे हे 'गवळण' च्या माध्यमातून संत एकनाथांनी शिकवले.**

**4. गोंधळ :-**

**i ) लोकसंस्कृतीमध्ये आदिमाया आदिशक्तीला जागृत करण्यासाठी अंबाबाईच्या नावानं 'गोंधळ' केला जातो.**

**ii) गोंधळ हा कलाप्रकार एक विधिनाट्य असून, शुभकार्याप्रसंगी कुठलाही गडबड - गोंधळ होऊ नये म्हणून गोंधळ घातला जातो.**

**iii) गोंधळ हा कलाप्रकार आपल्याकडे लग्नसमारंभ किंवा शुभकार्यप्रसंगी गोंधळ घालण्याची प्रथा महाराष्ट्रामध्ये रूढ आहे.**

**iv) गोंधळ हा धार्मिक विधी शाक्त भक्तीचा प्रकार असून गोंधळी सर्व देवी देवतांना आवाहन करतात आणि नंतर देवीचा महिमा गातात.**

5. फटका (शाहिरी फटका) :- • विविध गायन प्रकारांपैकी 'फटका - शाहिरी फटका' या माध्यमातून लोकरंजनातून लोकशिक्षण दिले जाते. समाजपरिवर्तनासाठी शाब्दिक फटके बसले जातात आणि मानव कल्याणाला चालना मिळते.

6. अभंग :-

i) अभंग हा प्राचीन मराठी साहित्यात विकसित झालेला विशेष काव्यप्रकार आहे.

ii) लोकसंस्कृतीमध्ये अभंग हे एक अक्षरवृत्त किंवा छंदाचा प्रकार आहे.

iii) आध्यात्मिक आशयाच्या अभिव्यक्तीसाठी वारकरी संप्रदायातील संतांनी 'अभंग' या काव्य प्रकाराचा व छंदाचा प्रथम उपयोग केलेला आहे.

iv) अनेक संतांनी अभंगाच्या रूपातून काव्यपंक्ती लिहिल्या आणि त्या समाजात - जनलोकात खोलवर रुजवल्या.

7. वाघ्या-मुरळी : जागरण :-

i) जागरण म्हणजे महाराष्ट्राचं आराध्य दैवत असलेल्या 'जेजुरीचा खंडोबा'चे उपासक असलेले वाघ्या मुरळी द्वारे केला जाणारा विधी.

ii) अनेक लोककलांची जननी असलेल्या जागरणातील वाघ्या-मुरळी हे भक्त देवीदेवतांनी

जागरणाला आवर्तन दिल्यावर खंडोबाची लीला वर्णन करणारी गाणी म्हणतात.
iii) व्यक्तीला जागृत अवस्था प्राप्त करण्यासाठी देवाच्या नावाने जागरण केले जाते.

iv) या सादरीकरणामध्ये आवाहन, गण, कथन व आरती अशी विभागणी असते.

**v) पिवळं पातळ, कपाळावर भंडारा, पदराला बांधलेली घंटी (म्हणजेच घाटी) वाजवत मुरळी नाचते आणि हातात दिमडी - घाटी घेऊन मुठीने भंडारा उधळत 'हब हब हब' म्हणत नाचणारा वाघ्या त्या मुरळीला साथ करतो.**

**vi) वाघ्या मुरळी आयुष्यभर खंडोबाची भक्ती करत असत.**

**8. लावणी :-**

**i) लोकांच्या मनोरंजनासाठी नृत्य, संगीत, अभिनय यांच्या संयोगातून सादर केला जाणारा कलाविष्कार म्हणजे लावणी होय.**

**ii) लवण उत्पन्न करणारी अशी ती, शृंगार रस बाजात खिळवून ठेवणारी अशी ती, लावण्याने परिपूर्ण असणारी अशी ती, शृंगाराने परिपूर्ण असणारी अशी ती, लावण्यवतींच्या पदन्यासाने व अदाकारीने सादर होणारी अशी ती महाराष्ट्राची आन बाण शान म्हणजे लावणी !**

**iii) तमाशाच्या फडापासून ते ऑर्केस्ट्राच्या स्टेजपर्यंत, शाळेतल्या गॅदरिंगपासून ते चित्रपटापर्यंत अशी सर्वदूर अनेक अदाकारांनी लावणी लोकांचं मनोरंजन करण्यासाठी सादर केलेली आहे.**

**iv) काळानुसार लावणी बदलत गेली, समृद्ध होत गेली. अलीकडच्या काळात तर लावणी थेट डीजेवर सुद्धा वाजत आहे.**

**v) लावणीच्या विविध प्रकारांनुसार तिचं सादरीकरण केलं जातं. महाराष्ट्रासोबत संपूर्ण जगाला लावणीनं भुरळ घातली आहे. नृत्यांगना अतिशय उत्कृष्ट पद्धतीने लावणी सादर करतात.**

**9. शाहिरी पोवाडा :-**

**i) महाराष्ट्राचा प्राण म्हणून प्रसिद्ध असलेला शाहिरी पोवाडा ही अशी कला आहे ज्या कलेने आपल्या भारतासाठी - महाराष्ट्रासाठी जनसामान्यांचे प्रबोधन करीत मनोरंजन केले आहे.**

**ii) शाहिरी पोवाड्याने मनोरंजन करीत आपल्या धमन्यांमधील रक्त वीरश्री केले आहे.**

**iii) धगधगत्या धमन्यांमधील सळसळतं रक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी व देश संरक्षणासाठी समृद्ध केलं आहे.**

**iv) शाहिरांनी हातात डफ घेऊन अनेक शूर विरांच्या पराक्रमांच्या कर्तृत्वसंपन्नतेच्या यशोगाथा जनमानसांपर्यंत पोहोचवल्या आहेत.**

**v) शिवाजी महाराजांचा काळ असेल किंवा पेशवाई काळ असेल, स्वातंत्र्याचा लढा असेल, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असेल ते आजतागायत विविध सामाजिक सांस्कृतिक - राष्ट्रीय प्रश्नांवर शाहिरांनी मार्मिक बोट ठेवून हा महाराष्ट्र घडवलेला आहे.**

**vi) म्हणूनच तर म्हणतात ना शाहीर हा महाराष्ट्राचा प्राण आहे !**

**10. कोळी नृत्य :-**

**i) शिमगा होळी हा सण कोळीवाड्यात कोळी लोक आवडीने आनंदोत्सव साजरा करताना जे लोकप्रिय नृत्य सादर करतात ते कोळी नृत्य होय !**

**ii) सणासुदीच्या वेळी आणि लग्न समारंभाचे प्रसंगी कोळी स्त्री-पुरुष सामूहिक नृत्य करतात. या कोळी नृत्यातील ताल, ठेका, पदन्यास अत्यंत सुंदर व पाहण्यासारखा असतो.**

iii) नारळी पौर्णिमेच्या दिवशी वाजतगाजत सोन्याचा मुलामा दिलेला नारळ समुद्राला अर्पण करतात. घरोघरी नारळीभात, नारळवडी, करंज्या यांचा नैवेद्य करतात.

iv) नारळी पौर्णिमेच्या दिवसानंतर बोटीची पूजा करून कोळी लोक समुद्रात व्यवसायासाठी होडी उतरवतात.

v) अशा या नारळी पौर्णिमेच्या उत्सवप्रसंगी कोळीगीतांद्वारे मनोरंजन व मौजमजा करत कोळी लोक आनंदी जीवन जगतात.

11. भारुड :-

i) निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम अशा थोर संतांनी महाराष्ट्र भूमीला पावन केले त्या संतवाणीतील बहुरूढ झालेला प्रकार म्हणजे भारुड !

ii) जनसामान्यांच्या समाजप्रबोधनासाठी 'भारुड' या सहज व सोप्यातला सोपे साहित्य - लेखन कला स्वरूपाचा वापर केलेला आहे.

iii) शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांनी आपल्या सोप्या सहज सुलभ साध्या संतवाणीतून जे गीत, काव्य, प्रवचन लिहिले व सादर केले ते 'भारुड' जनमानसात मनोरंजनासोबत प्रबोधन करत राहिलेले आहे.

iv) 'विंचू चावला', 'बुरगुंडा', 'नवरा नको ग बाई, मला दादला नको ग बाई' अशी काही प्रसिद्ध असलेली भारूडे आहेत !

**सारांश ...**

**i) महाराष्ट्राला समृद्ध लोककलांचा वारसा लाभलेला असल्याने मौखिक व क्रांती अशा दोन भक्कम तीरांमधून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा प्रवाह अखंडपणे वाहत आहे.**

**ii) मौखिक परंपरेत नृत्य, नाट्य, संवाद, लोकगीते, लोकभूमिका यांचा सुरेख समन्वय साधलेल्या लोकसंस्कृतीतून मानवी मनाचे उत्कृष्ट भावदर्शन अनुभवास येते.**

**iii) महाराष्ट्राच्या लोककला, महाराष्ट्राच्या लोकभूमिका, लोकगीते, लोकसाहित्य या सर्व पैलूंच्या एकत्रीकरणातून - Synchronizing मधून उभी राहते, जाणवते, दिसून येते, स्पष्ट होते ती म्हणजे महाराष्ट्राची लोकसंस्कृती !**

**iv) मनोरंजन आणि समाजप्रबोधन घडवून आणण्यासाठी...**

**a) समजण्यास सोपी भाषा.**

**b) पेलणारे मानवणारे वर्तणूक तत्त्वे**

**c) वेदांताचा अर्थ सांगण्यासाठी स्थानिक व बोली भाषा**

**d) नैतिकतेची मूल्ये - शाश्वत मानवी मूल्ये मनःशांतीसाठी आध्यात्मिक शैली द्वारा सर्वसामान्य जनसमुहात रुजविलेल्या व अंतःकरणाचा ठाव घेतलेल्या लोककला म्हणजे एक स्वतंत्र लोक विद्यापीठ आहे. ज्याचा अभ्यास केल्याने व आचरणात आणल्याने साध्य होणार आहे...**

**'आनंदी जीवन आणि मानव कल्याण' !**

**प्रा. शाहीर अजिंक्य सुरेश लिंगायत ✒️**